# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/ ८०/२०१३-१४/५० दिनांक : २७.०५.२०१४

**<u>आदेश केस क्र.८०/१३-१४</u>**

सौ.सिध्दगंगवा सिध्दाप्पा बिरादार, अर्जदार
मु.पो.हळ्ळी,
ता.जत, जिल्हा - सांगली.

**विरुध्द**

१) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय,सांगली.

२) कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय,कवठेमहांकाळ.

३) सहाय्यक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उपविभागीय कार्यालय,संख.

पक्षकार

**कोरमः-** १. श्री.बी.जी.पवार,अध्यक्ष
२. श्री.जी.बी.पानकर, सदस्य सचिव
३. श्री.जी.सी.लेले,सदस्य

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**
**(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)**
**विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार**

**<u>न्याय निर्णय</u>**

श्री.जी.सी.लेले, ग्राहक सदस्य, ग्रा.त.नि.मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

सौ.सिध्दगंगवा सिध्दाप्पा बिरादार,मु.पो. हळ्ळी ता.जत यांनी येथील गट क्र.१३८/ब मध्ये शेतीवापरासाठी नवीन वीजपुरवठा मिळावा म्हणून दि.२३.०७.२०१३ रोजी उपविभागीय कार्यालय,संख यांच्याकडे अर्ज केल्याचे दिसून येते. सदर ठिकाणी थकबाकीच्या कारणास्तव वि.प.ने वीजपुरवठा देण्यास असमर्थता दाखविल्याने ग्राहकाने प्रतिनिधीमार्फत दि.१८.०२.२०१४ रोजी टपालाने अ नमुन्यात मंचामध्ये तक्रार दाखल केली आहे. मंचाने रीतसर तक्रार दाखल करुन घेऊन वि.प.कडून मुद्देनिहाय अभिप्राय मागविला व त्यानंतर दि.१८.०३.२०१४ रोजी मंच कार्यालय, कोल्हापूर, येथे सुनावणीची तारीख निश्चित करुन सुनावणी प्रक्रिया पूर्ण केली. सुनावणीच्या वेळी वि.प.तर्फे कार्यकारी अभियंता व इतर संबंधित उपस्थित होते. ग्राहक प्रतिनिधी श्री.हरिभाऊ खापरे उपस्थित होते.

सदर तक्रार दाखल करुन सुनावणी घेतेवेळी वि.प.कडून काही कागदपत्रे देण्यास मुदत मागितली. तशी मुदत मंचाने दिली. मात्र निर्णय होईपर्यंत कोणत्याही प्रकारची आवश्यक कागदपत्रे वारंवार दूरध्वनी व भ्रमणध्वनीवरुन संपर्क करुन ही दाखल केली नाही. त्यामुळे उपलब्ध कागदपत्रानुसार निर्णय केलेला आहे व त्यामुळेच न्यायनिर्णयास विलंब झाला आहे.

प्रत्यक्षात दाखल तक्रार त्यासंबंधीची कागदपत्रे, वि.प.ने दाखल केलेला मुद्देनिहाय अभिप्राय अंतर्गत कक्षाचा निर्णय, सुनावणी दरम्यानची कथने व म्हणणे यावरुन सर्वसाधारणपणो ग्राहकाची तक्रार व मागणी व वि.प.ची भुमिका याचे स्वरुप पुढीलप्रमाणे दिसून येते.

## ग्राहकाच्या तक्रारीचे स्वरुप

ग्राहकाने दि.२३.०७.२०१३ रोजी गट क्र.१३८/ब मु.करजगे येथे शेतीवापरासाठी ५ एच.पी. इतक्या वीजजोडणीसाठी अर्ज केल्याचे नमुद केले आहे. सदरचा अर्ज दाखल केल्यावर वि.प.ने सदर अर्जदाराचे पती श्री.सिध्दाप्पा गुरुलिंगाप्पा बिरादार यांचे नांवे सदर नंबरमध्ये वीजकनेक्शन होते ते थकबाकीसाठी बंद केले असल्यामुळे सदरची थकबाकी भरल्याशिवाय वीजजोडणी मिळणार नाही अशी भुमिका वि.प.ने घेतल्यामुळे व ते चुकीचे असल्यामुळे ग्राहकाने प्रथमतःअंतर्गत कक्ष व नंतर CGRF मध्ये तक्रार दाखल केली आहे. ग्राहकाच्या वतीने प्रतिनिधीने अनेक मुद्दे उपस्थित करुन सदरची थकबाकी देय नाही म्हणजेच मुदतीत नाही त्यामुळे सदर थकबाकीपोटी वीजजोडणी थांबविणे हे चुकीचे असल्याचे नमुद करुन वीजजोडणीचे मागणे नोंदविले आहे. तसेच सदरची कथाकथित बाकी कालबाह्य झाली असल्याने ग्राहकाचा अर्ज प्रलंबित ठेवणे ही कृती कायदेशीर नाही हे निश्चित व्हावे. सदर ग्राहकाचे थकबाकी १९९७ मध्येच भरली असल्याने वि.प.ने डांबाव्यतिरिक्त सर्व साहित्य काढून नेले आहे असे असतांना सुध्दा कारण नसतांना वीजपुरवठा कायमचा बंद केल्याची तारीख १५.०३.२००८ अशी नोंदविली आहे. ती चुकीची आहे. सदर कालावधीमधील बिले वि.प.कडून दिली गेली नाहीत. तसेच विनिमयातील तरतुदी विचारात घेता अर्ज अपूर्ण असला तरी नेमस्त मुदतीत चलन देणे ही बाब कायद्यास धरुन आहे. तसे वि.प.ने केलेले नाही. सबब वीज अर्ज मंजुर व्हावा व कृती मानंकानुसार ग्राहक भरपाई मंजुर व्हावी असे नमुद केले आहे.

## वि.प.ची भुमिका व कार्यवाही

वि.प.ने आपल्या पत्र क्र.१२२० दि.१५.०३.२०१४च्या पत्रात वीजजोडणी न देण्यामागची कारणे दिलेली आहेत. त्यामध्ये वि.प.ने असे नमुद केले आहे की तक्रारीमधील ग्राहकाने अर्ज केल्यावर स्थळतपासणी केल्यावर शाखा अधिकारी बोर्गी यांना असे लक्षात आले आहे की सदर गट क्रमांक मध्ये अर्जदार यांचे पती श्री.सिध्दाप्पा गुरुलिंगाप्पा बिरादार यांचे नांवे वीजजोडणी होतीी. थकबाकीपोटी सदरची जोडणी बंद केलेली आहे. सदर पत्रामध्ये ग्राहकाचा क्रमांक २७०५७००८६५३६ असे नमुद करुन रु.७०,९०६/- इतकी थकबाकी असल्याचे नमुद करुन सदरची जोडणी दि.१५.०३.२०१३ रोजी थकबाकीसाठी कायमस्वरुपी बंद करण्यात आली आहे. सदरची माहिती अर्जदार यांना पोष्टाने कळविलेली आहे. त्यामुळे सदरची बाकी पूर्णपणे भरल्यावर अर्जदार यांना सदर गट क्रमांकामध्ये जोडणी देण्यात येईल. पत्र क्र.२९४ दि.२२.०१.२०१४ ने उपविभाग संख यांनी तक्रारदार यांना पाठविलेल्या पत्राची प्रत तसेच गावकामगार तलाठी यांचा क्र.२६ चा फेरफार उतारा जोडला आहे व थकबाकी भरण्याबाबत योग्य ते आदेश पारित व्हावेत अशी मंचास विनंती केली आहे.

ग्राहकाची मागणी व वि.प.ची भुमिका यांचा सविस्तर अभ्यास केल्यावर न्यायनिर्णयासाठी मंचापुढे पुढील मुद्दे उपस्थित होतात.

**प्रश्न १:** वारसाच्या थकबाकीसाठी अर्ज नामंजुर करणे योग्य आहे काय?
**उत्तरः** वारस सिध्द करणे आवश्यक आहे.
**प्रश्न २:** आदेश
**उत्तर :** अंतिम आदेशाप्रमाणे.

## कारणमिमांसा

सौ.सिध्दगंगवा सिध्दाप्पा बिरादार,मु.पो. हळ्ळी यांनी करजगी ता.जत येथील गट क्र.१३८/ब मध्ये शेतीवापरासाठी नवीन वीजपुरवठा मिळावा म्हणून दि.२३.०७.२०१३ रोजी उपविभागीय कार्यालय,संख यांच्याकडे अर्ज केल्याचे दिसून येते. सदर १३८/ब या गट नं.मध्ये पूर्वीची श्री.सिध्दाप्पा गुरुलिंगाप्पा बिरादार यांच्या नांवे थकबाकी असल्याने व सदरील ग्राहक हे अर्जदार यांचे पती असल्यामुळे असलेली थकबाकी भरल्याशिवाय वीजजोडणी दिली जाणार नाही अशी भुमिका वि.प.कडून घेतल्याचे दिसून येते.

सदर अर्जदार यांचे पती श्री.सिध्दाप्पा गुरुलिंगाप्पा बिरादार यांच्या नांवे वीज जोडणी होती ही बाब खरी आहे. अर्जदार यांनी याबाबत वि.प.चे वीज बील सोबत जोडले आहे. त्यावरील ग्राहक क्रमांक हा २७०५७००८६१३५ असा असल्याचे दिसून येते. तसेच ग्राहकाच्या प्रतिनिधींनी माहिती अधिकारात मागितलेल्या कागदपत्रातील सदरील क्रमांक दिला आहे. तथापि वि.प.कडून पत्रव्यवहार करतांना अगर थकबाकी संदर्भात ग्राहक क्रमांक दाखवितांना २७०५७००८६५३६ असा नमुद केला

आहे. सदरचा ग्राहक क्रमांक हा कागदपत्रावरील पुराव्यामुळे चुकीचा असल्याचे दिसून येते. वि.प.ने आपल्या दि.२२.०१.२०१४ पत्र क्र.२९४ ग्राहकास अग्रेषित केलेल्या पत्रात दिलेली थकबाकी संदर्भातील माहिती चुकीची असल्याचे दिसून येते. सदरील जोडणी १५.०३.२०१३ रोजी कायमस्वरुपी बंद केल्याचे नमुद केले आहे. या उलट वि.प.च्याच दि.०९.०५.२०१४ पत्र क्र.१५१६ मध्ये वीज जोडणी कायमस्वरुपी बंद केल्याची तारीख १५.०३.२००८ असे नमुद केले आहे. ग्राहकाने माहिती अधिकारात दिलेल्या कागदपत्रामधील नोंदीमध्ये १५.०३.२००८ हीच तारीख नोंद असल्याने तीच तारीख निश्चित धरणे आवश्यक आहे. दि.१५.०३.२००८ नंतर वि.प.कडून सदरील थकबाकीदार यांच्या थकबाकी वसुलीसाठी कोणताही कायदेशीर मार्ग अवलंबिला गेला नसल्याचे दिसून येते. अर्जदाराने मागणी केल्यावर केवळ अडवणुक करुन रक्कम वसुल करावयाची याच उद्देशाने अर्ज नामंजुर केला आहे व थकबाकी भरल्यानंतर अर्ज मंजुर करण्यात येईल असे नमुद केले आहे. सदरील थकबाकी ही नेमकी कोणत्या सालातील आहे याची विचारणा करुन ही वि.प.कडून कोणतील अधिकृत माहिती दिली गेलेली नाही. मात्र ग्राहकाने दाखल केलेल्या कागदपत्रात सदरील थकबाकी ही ३०.६.१९९७ ची असल्याचे दिसून येते. सदर तारखेपासून १५.०३.२००८ पर्यंत व त्यानंतर अर्ज करेपर्यंत वसुलीसाठी कोणताही रीतसर मार्ग वि.प.ने अवलंबिला नाही. याची खातरजमा मंचाने केली आहे व त्यामुळेच सदरची थकबाकी ही वसुलीयोग्य नसल्याने या कारणास्तव अर्ज निकाली ठेवता येणार नाही असे मंचाचे स्पष्ट मत झाले आहे.

मंचाने विनियमातील १०.५ या तरतुदींचा ही विचार केला आहे व त्या अनुषंगाने वि.प.कडून पुराव्यादाखल कागदपत्रांची मागणी केली. ब-याचवेळा पाठपुरावा करुन, दूरध्वनीवरुन संपर्क करुनही वि.प.कडून आवश्यक माहिती उपलब्ध झाली नाही. जे कागद मंचामध्ये दाखल केले त्यामध्ये सिध्दगंगवा सिध्दाप्पा बिरादार यांच्या नांवे कोणतीही नोंद ७/१२ पत्रकात वा फेरफारमध्ये नोंद नाही. सदर ७/१२ पत्रकात शांताबाई सिध्दाप्पा बिराजदार यांनी वर्दी दिल्याचे व माझे पती श्री.सिध्दाप्पा गुरुलिंगाप्पा बिराजदार हे मयत झाल्याचे कळविले व त्याप्रमाणे शांताबाई व इतर वारसांची नांवे नमुद झाली आहेत. सदरील अर्जदार यांचा अर्ज घेतांना त्यांनी सादर केलेला मागणी अर्ज व सोबत जोडलेले कागद त्यामधील मुख्यत्वे ७/१२ हे पत्रक व फेरफारपत्रक याची शहानिशा करुन अर्ज दाखल करुन घेणे आवश्यक होते. तसे झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे सौ. सिध्दगंगवा सिध्दाप्पा बिरादार यांच्या नांवे ७/१२ पत्रक नोंद असणे तसेच त्यावर ज्याकारणासाठी जोडणी मागितलेली आहे त्यासाठीचे विहीर वा बोअरवेल याची नोंद असणे आवश्यक आहे. या सर्व कागदपत्रांची खातरजमा व पडताळणी करुन कागदपत्रे योग्य व कायदेशीर असतील तरच अर्ज मंजुर करणे योग्य आहे असे मंच सुचित करीत आहे.

अर्जदार यांनी मागणी अर्जावरील आपल्या नांवाच्या नोंदीमध्ये सिध्दगंगवा सिध्दाप्पा बिरादार अशीच नोंद केली आहे व त्याचप्रमाणे मंचामध्ये अर्ज करतांना त्याच नांवाने अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे तशा नावाची नोंद असलेले कागद अर्जदार यांनी दाखल करणे आवश्यक होते व आहे मात्र प्रथम पासूनच वि.प.कडून अपुरी व चुकीची माहिती मिळत गेल्याने तसेच कागदपत्रे हजर करण्यास विलंब झाल्याने न्यायनिर्णय करण्यास तरतुदीपेक्षा जास्त विलंब झाला आहे.

मंच असे सुचित करतो की ग्राहक/अर्जदार यांनी नव्याने आपला मागणी अर्ज व त्यासंबंधी आवश्यक कागदपत्रे ७/१२ पत्रक फेरफारपत्रक व त्यावरील नोंदी यासह दाखल करणे आवश्यक आहे. तसे झाल्यावर उपलब्ध माहितीनुसार वि.प.ने निर्णय घेणेचा आहे. सबब अर्जदाराची मागणी वा वि.प.ची मागणी या दोन्हीही गोष्टी याबाबत नवीन अर्ज दाखल केलेनंतर निश्चित केल्या जातील. सबब सदरचा अर्ज खालील आदेशासह पारित करण्यात येत आहे.

सबब मंच खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१) अर्ज निकालात काढण्यात येत आहे.

२) उभयतांनी दाखल केलेल्या कागदपत्रांचा आधार घेऊन ग्राहक व वि.प.यांच्या मागण्या योग्य नसल्याने मंचाने त्या बाबींचा विचार केला नाही.

३) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : २७.०५.२०१४

सही/-
(जी.सी.लेले)
ग्राहक सदस्य

श्री. बी.जी.पवार,अध्यक्ष .. सही/-

श्री. जी.बी.पानकर, सदस्य सचिव .. सही/-

एकमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

सही/-
(बी.जी.पवार)
अध्यक्ष